# ग्रामविकास व पंचायत राज विभाग

## जिल्हा परिषद ठाणे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान
## सन २०२५-२६

# “मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान”

उत्कृष्ट काम करणाऱ्या स्थानिक  स्वराज्य संस्था करिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" हे पुरस्कार अभियान दिनांक १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येत आहे.

“मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचे ”मुख्य घटक

१.सुशासन युक्त पंचायत,२. सक्षम पंचायत, ३. जल समृध्द, स्वच्छ व  हरित गाव निर्माण करणे,४. मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण ,५. गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण ६. उपजिविका विकास, सामाजिक न्याय ७.लोकसहभाग व  श्रमदान.

ठाणे जिल्हा परिषद, अंतर्गत जिल्हा स्तरावर मा. उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री ठाणे जिल्हा यांचे उपस्थितीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा शुभारंभ दिनांक १७/०९/२०२५ रोजी ग्रामपंचायत खोणी ता.कल्याण या ठिकाणी






# जिल्हास्तरीय कार्यशाळा
## जिल्हा परिषद,ठाणे.
## दिनांक ०३ /०९/२०२५




# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोकचळवळ उभी करण्यासाठी ठाण्यात कार्यशाळा संपन्न



**ठाणे :**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोकचळवळ उभी करण्यासाठी जिल्हा स्तरावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ३ सप्टेंबर, २०२५ रोजी ठाणे येथील बी. जे. हायस्कूल सभागृह, टेंभी नाका येथे "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" या शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जिल्हास्तर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत जिल्हा परिषदेबरोबरच जिल्ह्यातील सर्व विभागांचे प्रतिनिधी, अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहून अभियानाची उद्दिष्टे, भूमिका व जबाबदाऱ्या यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामविकासाला गती देऊन प्रत्येक गावात शाश्वत विकास साधण्यावर भर देण्यात आला.

ग्रामपंचायतींनी पीएम आवास, जलसंधारण व महसुलाशी संबंधित काम वेळेत करावे. समन्वय ठेवावा तसेच ग्रामपंचायतीना अभियानात पात्र होण्यासाठी गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांना योजनांची अचूक माहिती द्यावी. या कार्यशाळेत मनरेगा अंतर्गत घरकुल, पशुवैद्यकीय दवाखाने व सार्वजनिक मत्ता यांचे नोंदी व सुस्थितीत असल्याची दक्षता घेण्याबाबत सुचना दिल्या. महिला बचतगट, बांबू लागवड उपक्रम तसेच त्यासाठी बाजारपेठ उभारणी, आरोग्य व पायाभूत सुविधांसाठी मिशन कायाकल्पांतर्गत योजना प्रभावीपणे राबवावे. सौरदिवे, ई-लायब्ररी सारखे जिल्ह्यात नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घ्यावा. तसेच सर्व गांमपंचायतींना मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांत सहभागी होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ग्रामविकासाची खरी ताकद लोकसहभागात असल्याचे सांगून प्रत्येक ग्रामपंचायतीने स्वनिधी, जलसमृद्धी, घरकुल, पशुवैद्यकीय दवाखाने, सार्वजनिक मत्ता व उपजीविका योजनेसारख्या उपक्रमांवर ठोस कामकाज करावे, असे आवाहन केले. त्यांनी स्वामित्व योजना, मिशन कायाकल्प, आरोग्य सुधारणा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करून ग्रामपंचायतींनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात जल्लोषाने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यशाळेत सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण, संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभागातून लोकचळवळ, नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच विविध मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. स्वनिधी निर्मिती व लोकवर्गणीद्वारे ग्रामपंचायतींचे आर्थिक सक्षमीकरण, पाणीपुरवठा, जलसंधारण व पर्यावरण संवर्धन, शेततळे व घरकुल बांधकाम योजनेशी अभिसरण, ग्रामपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण आणि महिला बचतगट, शेतकरी व दुर्बल घटकांसाठी ठोस उपाययोजना यावर विशेष भर देण्यात आला.

# तालुकास्तरीय मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यशाळा





# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज  अभियान  ग्रामस्तरीय कार्यशाळा







# सुशासनयुक्त पंचायत: डोअर स्टेप डिलिव्हरी अंतर्गत घरपोच दाखले वाटप व तक्रार निवारण पेटी






# सक्षम पंचायत


नमुना "अ" मागणीच्या लेखाचा नमुना ( नियम ३ पहा )

ग्रामपंचायत:-डोहोळे

तालुका :-भिवंडी

लिपीक

नमुना "अ" मागणीच्या लेखाचा नमुना ( नियम ३ पहा )

ग्रामपंचायत:-डोहोळे

तालुका :-भिवंडी

लिपीक

नमुना "अ" मागणीच्या लेखाचा नमुना ( नियम ३ पहा )

ग्रामपंचायत:-डोहोळे

तालुका :-भिवंडी

लिपीक



# आयुष्यमान भारत आरोग्यकार्ड नोंदणी उपक्रम व स्वच्छता मोहीम






# लोकसहभाग व श्रमदान:लोकवर्गणी माध्यमातून रुग्णवाहिका लोकार्पण






# जल समृद्ध स्वच्छ आणि हरित गाव








# मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण






# उपजीविका विकास सामाजिक न्याय






# प्रचार व प्रसिद्धी

दैनिक **लोकांकीत**

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोक चळवळ उभी करण्यासाठी ठाण्यात कार्यशाळा संपन्न

**संतोष पडवळ । ठाणे**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोकचळवळ उभी करण्यासाठी जिल्हा स्तरावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ३ सप्टेंबर, २०२५ रोजी ठाणे येथील बी. जे. हायस्कूल सभागृह, टेंभी नाका येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जिल्हास्तर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत जिल्हा परिषदेबरोबरच जिल्ह्यातील सर्व विभागांचे प्रतिनिधी, अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहून अभियानाची उद्दिष्टे, भूमिका व जबाबदाऱ्या याबर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामविकासाला गती देऊन प्रत्येक गावात शाश्वत विकास साधण्यावर भर देण्यात आला.

ग्रामपंचायतींनी पीएम आवास, जलसंधारण व महसुलाशी संबंधित काम वेळेत करावे. समन्वय ठेवावा तसेच ग्रामपंचायतींना अभियानात पात्र होण्यासाठी गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांना योजनांची अचूक माहिती द्यावी. या कार्यशाळेत मनरेगा अंतर्गत घरकुल, पशुवैद्यकीय दवाखाने व सार्वजनिक मत्ता यांचे नोंदी व सुस्थितीत असल्याची दक्षता घेण्याबाबत सूचना दिल्या. महिला बचतगट, बांबू लागवड उपक्रम तसेच त्यासाठी बाजारपेठ उभारणी, आरोग्य व पायाभूत सुविधांसाठी मिशन कायाकल्पांतर्गत योजना प्रभावीपणे राबवावे. सौरदिवे, ई-लायब्ररी सारखे जिल्ह्यात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घ्यावा. तसेच सर्व ग्रामपंचायतींना मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सहभागी होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ग्रामविकासाची खरी ताकद लोकसहभागात असल्याचे सांगून प्रत्येक ग्रामपंचायतीने स्वनिधी, जलसमृद्धी, घरकुल, पशुवैद्यकीय दवाखाने, सार्वजनिक मत्ता व उपजीविका योजनेसारख्या उपक्रमांवर ठोस कामकाज करावे, असे आवाहन केले. त्यांनी स्वामित्व योजना, मिशन कायाकल्प, आरोग्य सुधारणा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करून ग्रामपंचायतींनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात जल्लोषाने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यशाळेत सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण, संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभागातून लोकचळवळ, नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच विविध मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. स्वनिधी निर्मिती व लोकवर्गणीद्वारे ग्रामपंचायतींचे आर्थिक सक्षमीकरण, पाणीपुरवठा, जलसंधारण व पर्यावरण संवर्धन, शेततळे व घरकुल बांधकाम योजनेशी अभिसरण, ग्रामपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण आणि महिला बचतगट, शेतकरी व दुर्बल घटकांसाठी ठोस उपाययोजना यावर विशेष भर देण्यात आला.



04 Sep 2025 - Page 4 | epaper.dainiklokankit.com
Powered by softisky | 9764331134

## ग्रामविकासासाठी जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

### आज होणार शुभारंभ; लोकसहभागातून उभी करणार विकासात्मक चळवळ

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शासनाच्या पुढाकारातून 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यभर राबविले जाणार आहे. या अभियानाचा ठाणे जिल्ह्यातील शुभारंभ कल्याण तालुक्यातील खोणी येथून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज, शुक्रवारी होणार आहे. या अभियानाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी माहिती दिली. यावेळी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी अभियानातील उपक्रमांबाबत विस्तृतपणे सांगितले.

अभियानात सुशासन युक्त पंचायत, सक्षम पंचायत, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा अशा विविध घटकांवर त्या त्या ग्रामपंचायतीला गुण दिले जाणार आहेत. या घटकांशी निगडित विविध उपक्रम तालुका तसेच ग्रामपंचायत स्तरावर राबविले जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात आली. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेमार्फत विस्तृत नियोजन करण्यात आले असून, प्रत्येक गावासाठी एक संपर्क अधिकारी आणि तालुका नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

अभियानाच्या कालावधीत विविध उपक्रम राबवून ग्रामपंचायतींना गुण देण्यात येणार असून त्याआधारे ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांना एकूण १,९०२ पुरस्कार वितरित केले जाणार आहेत.



#### हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र

राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी हरित महाराष्ट्र - समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत ठाणे जिल्हा परिषदेस १,५४,३०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील ५ तालुक्यांमधील सर्व ग्रामपंचायतींमध्ये आज एकत्रित वृक्षारोपण मोहिमेचे राबविण्यात येणार आहे.

#### अभियानाची वैशिष्ट्ये

- विकसित महाराष्ट्र २०४७ करिता गतीमान पंचायतराज
- ग्रामपंचायतींमध्ये विकासाची स्पर्धा
- लोकचळवळीद्वारे विकास
- योजनांची प्रभावी अंमलबजावणी
- पुरस्काराची एकूण रक्कम २४५.२० कोटी
- ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद मिळून एकूण १,९०२ पुरस्कार

#### अभियानाचे मुख्य घटक

- सुशासन युक्त पंचायत
- सक्षम पंचायत
- जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव
- मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण
- गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण
- उपजिवीका विकास, सामाजिक न्याय
- लोकसहभाग व श्रमदान
- नाविन्यपूर्ण उपक्रम

# ठाणे वार्ता

बातमी तीच, जी सत्य असेल!

## डोहोळे येथे ग्रामस्तरीय कार्यशाळा व विशेष ग्रामसभा संपन्न

**मिलिंद जाधव**

**भिवंडी –** मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे ग्रामस्तरीय कार्यशाळा व विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डोहोळे ग्रामपंचायतिच्या सरपंच सुमन वाघे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत स्तरावरील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्राम महसूल अधिकारी, कृषि सहाय्यक, आरोग्य सेवक, वन अधिकारी, मुख्याध्यापक, पशु वैद्यकीय अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, डाटा एंट्री ऑपरेटर, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा सेविका, महिला बचत गट अध्यक्ष, सचिव, युवक मंडळ व इतर विभाग अधिकारी व कर्मचारी ग्रामसेसाठी आवर्जून उपस्थित होते. या सभेत मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचे मुख्य घटक तथा विषय खालील प्रमाणे चर्चा करण्यात आली. त्यात दिनांक १७/०९/२०२५ रोजी ग्रामसभा व ग्रामस्तरीय समितीची स्थापना करणे तसेच विषयवार लहान गट स्थापना करणे. सुशासन युक्त पंचायत (लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन) तयार करणे.




सक्षम पंचायत (स्वनिधी, सी एस, आर,) लोकवर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे.) जल समृध्द, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे. मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे. गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे. उपजिविका विकास, सामाजिक न्याय. लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे, असे विषय घेण्यात आले.

21 Sep 2025 - Page 4


धन्यवाद